# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ०६ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक ०५/०२/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०५/०२/२०१९ मंगळवार दुपारी १.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती श्री.जितेंद्र भगवान मराठे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवान मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | सनकत चेतन गणेश |
| ढेकळे सदाशिव गणपत | कापसे मयुर चंद्रकांत |
| बेंडाळे उज्वला मोहन | पाटील प्रतिभा सुधिर |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| सोनवणे सुरेश माणिक | भंगाळे विष्णू रामदास |
| पोकळे दिलिप बबनराव | बरडे नितीन मनोहर |
| खडके सुनिल वामनराव | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| कोल्हे प्रविण रामदास | |

सदर सभेस, मा.आयुक्त,श्री.चंद्रकांत डांगे, मा.उपायुक्त,श्री.लक्ष्मीकांत कहार, नगरसचिव श्री.सुभाष मराठे उपस्थित होते.

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सभेला सुरुवात करणेत येत आहे.

**नगरसचिव:- विषय क्र. १)** दि.२२/०१/२०१९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की दि. २२/०१/२०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** भटक्या व मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण व रॅबीज प्रतीबंधक लस देणे इ. संस्थेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे कामी ६ महिने करीता कंत्राटी तत्वावर (मानधन) नियुक्ती अटी शर्तीस अधिन राहुन पशुवैद्यकीय अधिकारी नियुक्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मा.महासभा ठराव क्रं.६७ दि.०७/१२/२०१८ अन्वये मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याबाबत मा.सुप्रीम कोर्ट व AWBI च्या निर्देशानुसार मान्यता प्राप्त (AWBI) संस्थेस भटक्या व मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण व रॅबीज प्रतीबंधक लस देणे इ.संस्थेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे कामी AWBI मान्यता प्राप्त पशुवैदयकिय अधिकारी यांची नेमणूक करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

पशुवैदयकिय अधिकारी यांची कामाची निकड व आवश्यकता लक्षात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५३ (१) ते (३) अन्वये ६ महिने करीता कंत्राटी तत्वावर रक्कम रु.३०,०००/- प्रतिमहा प्रमाणे मानधनावर नियुक्ती करणेस अटी शर्तीस अधिन राहून पशुवैदयकिय अधिकारी यांची नियुक्ती करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** GeM पोर्टलवरुन प्रस्तावीत २ नग Water Tanker ९ kl WT TATA SE १६१३ TC ४२ CAB CHASISI BS III खरेदीचे दर रक्कम रु.३२,५७,८००/- प्राप्त L१ निविदाधारक TATA MOTORS LIMITED यांना कार्यादेश (WORK ORDER) देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, GeM पोर्टलवरुन प्रस्तावीत २ नग Water Tanker ९ kl WT TATA SE १६१३ TC ४२ CAB CHASISI BS III खरेदी करणे कामी तिसऱ्यांदा ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली असता विहित केलेल्या मुदतीत फक्त एकमेव TATA MOTORS LIMITED निविदा १ online Bid (ई-निविदा) प्राप्त झालेली आहे. प्राप्त एकमेव निविदा उघडून मा.आयुक्त यांचे मान्यतेने Technical Bid उघडून Technical Parameters ची विश्लेषणात्मक छाननी करण्यात आलेली आहे.

उपरोक्त TATA MOTORS LIMITED निविदाधारक हे निविदेतील नमुद केलेली टेक्निकल पॅरामिटरर्सची पुर्तता करीत असल्याने मा.आयुक्त यांचे दि.०१/१२/२०१८ चे मान्यतेने सदर निविदाधारकांचे Financial Bid समक्ष उघडले असता सर्वात कमी दर (किंमत) प्राप्त L१ निविदाधारक TATA MOTORS LIMITED यांची रक्कम रु. ३२,५७,८००/- मात्रच्या खर्चास व निविदाधारकास कार्यादेश (WORK ORDER) देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) मंजूरी देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखा विवरण पत्रात आरंभिची शिल्लक रु.१९,६९,२६,२४६/- व भाग अ व क ची एकुण रक्कम रु.२२६,१२,६२,७६४/- मात्र इतकी रक्कम जमा असुन झालेला खर्च रक्कम रु.१९४,३२,३५,०३३/- मात्र इतका आहे. वर्ष अखेर शिल्लक रक्कम रु.५१,४९,५३,९७७/- इतकी आहे. सदर शिल्लकेत जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव चे शेअर्स ची रक्कम रु.२,८१,७८,१००/- मात्र दर्शविलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ (१) चे तरतुदी नुसार सन २०१७-१८ चा वार्षिक हिशोबास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- ढेकळे सदाशिव गणपत**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ५)** महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१३/०८/२०१८ ते दि.०१/०९/२०१८ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१३/०८/२०१८ ते दि.१८/०८/२०१८, दि.२०/०८/२०१८ ते दि.२४/०८/२०१८ व दि.२७/०८/२०१८ ते दि.०१/०९/२०१८ अखेर संपणाऱ्या लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव:- विषय क्र. ६)** जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२६/११/२०१८ ते दि.०२/१२/२०१८, दि.०३/१२/२०१८ ते दि.०९/१२/२०१८, दि.१०/१२/२०१८ ते दि.१६/१२/२०१८, दि.१७/१२/२०१८ ते दि.२३/१२/२०१८ व दि.२४/१२/२०१८ ते दि.३०/१२/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हददीत व हददीबाहेर दि.२६/११/२०१८ ते दि.०२/१२/२०१८, दि.०३/१२/२०१८ ते दि.०९/१२/२०१८, दि.१०/१२/२०१८ ते दि.१६/१२/२०१८, दि.१७/१२/२०१८ ते दि.२३/१२/२०१८ व दि.२४/१२/२०१८ ते दि.३०/१२/२०१८ या कालावधीत लागलेल्या आगीबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८९ अन्वये अग्निशमन विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सोनवणे सुरेश माणिक**

**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**